# सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ

(पूर्वीचे पुणे विद्यापीठ)

## परिपत्रक क्र. १२६/२०२०

**विषय :— शैक्षणिक वर्ष २०२०—२१ च्या प्रथम सत्रासाठी (ऑक्टोबर/नोव्हेंबर २०२०) आयोजित करावयाच्या प्रात्यक्षिक/मौखिक/सेमिनार/प्रोजेक्ट/सेशनल परीक्षाबाबत..**

कोविड—१९ करोना साथीच्या प्रादुर्भावामुळे विद्यापीठ संलग्नित सर्व महाविद्यालयातील शैक्षणिक उपक्रम प्रत्यक्षरित्या सुरु होऊ शकलेली नाहीत. त्यामुळे महाविद्यालयातील विद्यार्थी प्रयोगशाळा व इतर तांत्रिक साधनसामुग्रीचा उपयोग करुन प्रात्यक्षिके करु शकलेली नाहीत. अशा परिस्थितीत महाविद्यालये नियमित सुरु झाल्यानंतरच ही प्रात्यक्षिके घेण्यात येणार आहेत. या सर्व अडचणींची चर्चा सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या विविध अधिकार मंडळाच्या सभेत करण्यात आली. यासंदर्भात विद्यापीठ अधिकारमंडळाने घेतलेल्या निर्णयानुसार कळविण्यात येते की, सर्व संलग्नित महाविद्यालयातील नियमित (Fresh) विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक वर्ष २०२०—२१मधील प्रथम व व्दितीय सत्राच्या प्रात्यक्षिक/मौखिक/सेमिनार/प्रोजेक्ट/सेशनल इत्यादी महाविद्यालय स्तरावरील घेण्यात येणा—या सर्व (लेखी/तोंडी) परीक्षा एकत्रितरीत्या शैक्षणिक वर्ष २०२०—२१ च्या व्दितीय सत्राच्या (मार्च/एप्रिल २०२१) परीक्षा समवेत सत्रनिहाय स्वतंत्रपणे घेण्यात याव्यात.

तसेच या नियमित विद्यार्थ्यांचे परीक्षा आवेदन पत्र भरतांना Online Exam Form भरण्याच्या प्रकियेमध्ये कोणताही बदल न करता लेखी परीक्षांबरोबर, प्रात्यक्षिक/मौखिक/सेमिनार/प्रोजेक्ट/सेशनल व इतर अभ्यासक्रमामध्ये नमुद परीक्षांची माहिती प्रचलित पध्दतीनुसार भरण्यात यावी. तथापि तांत्रिक अडचणी येऊ नये म्हणून या नियमित (Fresh) विद्यार्थ्यांचे प्रथम सत्रातील विद्यापीठ परीक्षांचे निकाल फक्त ऑनलाईन पध्दतीने जाहीर करण्यात येतील तसेच प्रथम व व्दितीय सत्राच्या मूळ गुणपत्रिका एकत्रितरीत्या व्दितीय सत्राच्या गुणपत्रकांसमवेत स्वतंत्रपणे एकत्र महाविद्यालयात पाठविण्यात येतील.

पुढे असेही कळविण्यात येते की, अनुशेषित (Backlog) विद्यार्थ्यांच्या प्रात्यक्षिक/मौखिक/सेमिनार/प्रोजेक्ट/सेशनल परीक्षा मात्र नेहमीप्रमाणे आयोजित करण्यात येऊन त्यांचे प्रथम सत्राचे निकाल लेखी परीक्षेच्या आयोजनानंतर जाहीर करण्यात येईल.

मा. प्राचार्य/संचालक, सर्व संलग्नित महाविद्यालये/मान्यताप्राप्त संस्था यांना विनंती करण्यात येते की, सदर परिपत्रकाचा आशय आपल्या महाविद्यालयातील विद्यार्थी, शिक्षक, शिक्षकेतर सेवक व इतर सर्व संबंधितांना अवगत करण्यात यावा व सदर परिपत्रकानुसार पुढील आवश्यक कार्यवाही करण्यात यावी.

(महेश काकडे)
संचालक
परीक्षा व मूल्यमापन मंडळ

संदर्भ : परीक्षा—समन्वय/४४३
दिनांक : २२/१२/२०२०

प्रत माहितीसाठी व योग्य त्या कार्यवाहीसाठी:—

मा. प्राचार्य/संचालक, सर्व संलग्नित महाविद्यालये व मान्यताप्राप्त संस्था.